# आयुक्त आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान

सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कार्यालय

NHM राष्ट्रीय आरोग्य अभियान महाराष्ट्र

दुरध्वनी – ०२२ – २२७१७५००
फॅक्स – ०२२ – २२६४२९५५
E-mail - mdnrhm.mumbai@gmail.com

आरोग्य भवन, ३रा मजला,
सेंट जॉर्ज रूग्णालय आवार, पी. डिमेलो रोड,
सीएसटी जवळ, फोर्ट, मुंबई ४००००१


जा.क्र. रानाआअ/जाहिरात/२०२६/ ११३६७०

दि. १३ ऑगस्ट, २०२६

## जाहिरात

**महानगरपालिकांतील नियमित वैद्यकिय आरोग्य अधिका-यांच्या रिक्त पदावर सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत समकक्ष संवर्गातील आरोग्य अधिका-यांच्या प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यासाठी विभागातील आरोग्य अधिका-यांकडून अर्ज मागविण्याबाबत.**

१. राज्यातील शहरी आरोग्य व्यवस्था बळकट करण्याच्या दृष्टीने सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत शहरी आरोग्य आयुक्तालय (Commissionerate, Urban Health) स्थापित करण्यास दि. ०४ नोव्हेंबर, २०२५ च्या शासन निर्णयान्वये मान्यता दिली आहे व शहरी आयुक्तालयाची कर्तव्ये व जबाबदा-या निश्चित करण्यात आल्या आहेत. त्यानुसार ज्या महानगरपालिकेत नियमित वैद्यकिय आरोग्य अधिका-यांची पदे रिक्त आहेत, अशा सर्व महानगरपालिकांमध्ये वैद्यकिय आरोग्य अधिका-यांची पदे सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत प्रतिनियुक्तीने भरण्यात यावीत, असे निर्देश आहेत.

२. नियमित वैद्यकिय आरोग्य अधिका-यांची पदे महानगरपालिकेच्या आस्थापनावरील पदे आहेत. त्यानुसार सार्वजनिक आरोग्य विभागातील समकक्ष संवर्ग व वेतनश्रेणी यांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे:-

| अ. क्र. | महानगरपालिका संवर्ग | सार्वजनिक आरोग्य विभागातील समकक्ष संवर्ग | संख्या | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|---|
| १. | अ व ब वर्ग महानगरपालिका | उपसंचालक | ५ | एस-२५ |
| २. | क व ड वर्ग महानगरपालिका | सहायक संचालक (जिल्हा आरोग्य अधिकारी संवर्ग) | २३ | एस-२३ |

३. सार्वजनिक आरोग्य विभागातील उपसंचालक, आरोग्य सेवा व सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा या संवर्गातील पात्र अधिका-यांकडून महानगरपालिकांतील नियमित वैद्यकिय आरोग्य अधिका-यांच्या रिक्त पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर पदांचा तपशिल सोबतचे परिशिष्टात नमूद केला आहे.

४. पात्र अधिकाऱ्यांनी सदर परिशिष्टात नमूद केलेल्या महानगरपालिकेतील नियमित वैद्यकिय आरोग्य अधिकारी या पदाकरिता अर्ज करावा.

५. सर्व बाबतीत परिपूर्ण असलेले अर्ज राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानाच्या **nuhmmaharashtra18@gmail.com** या ईमेलवर **दिनांक ३१ ऑगस्ट, २०२६ पूर्वी** पाठवावेत.

६. प्रत्येक अर्जासोबत खालील कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे:-

१) संबंधित पदाकरिता दूरदृष्टी दस्तऐवज (Vision Document) - शब्द मर्यादा ५००,

२) तीन वर्षाचा कृती आराखडा (Action Plan) आणि

३) सदर पदाकरिता अर्जदाराच्या योग्यतेबाबतचे निवेदन- शब्द मर्यादा ५००.

७. कोणत्याही परिस्थितीत अपूर्ण असलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

८. अपवादात्मकरीत्या उत्कृष्ट पात्रता असलेल्या अधिका-यांचा सक्षम प्राधिकाऱ्याच्या विवेकाधिकारानुसार, एक स्तर वरील पदावर प्रतिनियुक्तीकरिता विचार केला जाऊ शकेल.

**सोबत:-** परिशिष्ट- रिक्त पदांची यादी.

**(डॉ. सुनिल भोकरे, भा. प्र.से.)**
**आयुक्त, शहरी आरोग्य**
**आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई**

| परिशिष्ट | | | |
|---|---|---|---|
| महानगरपालिकेतील नियमित वैद्यकिय आरोग्य अधिकारी रिक्त पदांचा तपशिल | | | |
| अ. क्र. | महानगरपालिका | वर्गवारी | रिक्त पदे |
| १ | पुणे | अ | १ |
| २ | ठाणे | ब | १ |
| ३ | नाशिक | ब | १ |
| ४ | कल्याण डोंबिवली | क | १ |
| ५ | छत्रपती संभाजीनगर | क | १ |
| ६ | वसई विरार | क | १ |
| ७ | नवी मुंबई | क | १ |
| ८ | सोलापूर | ड | १* |
| ९ | कोल्हापूर | ड | १ |
| १० | सांगली मिरज कुपवाड | ड | १ |
| ११ | मिरा भाईंदर | ड | १ |
| १२ | उल्हासनगर | ड | १ |
| १३ | भिवंडी निजामपूर | ड | १* |
| १४ | अहिल्यानगर | ड | १ |
| १५ | अकोला | ड | १ |
| १६ | जळगांव शहर | ड | १ |
| १७ | नांदेड वाघाळा | ड | १ |

| परिशिष्ट | | | |
|---|---|---|---|
| महानगरपालिकेतील नियमित वैद्यकिय आरोग्य अधिकारी रिक्त पदांचा तपशिल | | | |
| **अ. क्र.** | **महानगरपालिका** | **वर्गवारी** | **रिक्त पदे** |
| १८ | धुळे | ड | १ |
| १९ | लातूर | ड | १* |
| २० | चंद्रपूर | ड | १ |
| २१ | परभणी | ड | १ |
| २२ | जालना | ड | १ |
| २३ | इचलकरंजी | ड | १ |
| | **एकूण** | | **२३** |

**टिपः-** * सदर ठिकाणी कार्यरत अधिकारी वैद्यकिय अधिकारी संवर्गातील असल्याने सदरचे पद रिक्त दर्शविण्यात आले आहे.

*****